फौ.चौ.अर्ज क्र.१२/२०१६
प्रियंका व इतर वि.
दिपक व इतर

नि.क्र.२८

सदर अर्ज कौटुंबिक हिंसाराचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कलम २३ नुसार दरमहा अंतरिम आदेश म्हणून आर्थिक मदत मिळणेसाठी आहे.

०२. अर्ज, शपथपत्र, मूळ अर्ज, म्हणणे व कागदपत्राचे अवलोकन केले.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

०४. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, तिचा व सामनेवाला क्र.१ चा विवाह दि.१५/०५/२००९ रोजी हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे झाला. सदरहू विवाह संबंध अद्याप कायम असुन विवाहसंबंधातुन त्यांना दोन अपत्ये आहेत. सामनेवाला यांनी अर्जदारांचा दि.०१/०८/२०१५ पासुन त्याग केलेला आहे. अर्जदाराने स्वत: नांदावयास घेवुन जावे म्हणुन प्रयत्न केले परंतु सामनेवाला क्र. १ याने नकार दिला आहे. मुळ अर्ज निकाली लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. अर्जदारास कोणतेही उत्पन्नाचे साधन नसून ती स्वत:चा व मुलांचा सांभाळ करण्यास असमर्थ आहे.

०५. अर्जदाराचे पुढे प्रकरण असे की, सामनेवाला याची मौजे वरखेडी येथे बागायती शेती असुन त्यापासुन त्यास आठ ते दहा लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाले यांचा वरखेडी येथे स्वामी ड्रेसेस हे दुकान असुन त्यापासुन महीन्याला विस ते पंचवीस हजार रुपये मिळतात. सामनेवाले यांचे माऊली अलंकार नावाने दुकान असुन त्यापासुन त्यास पन्नास ते साठ हजार रुपये उत्पन्न मिळते. सामनेवाले हे विविध यात्रा करतात, त्यापासुन त्यांना पाच ते सहा लाख रुपये उत्पन्न मिळते. सामनेवालेकडे दोन

नि.क्र.२८

गाडया असुन त्यापासुन त्यांना महिन्याला पन्नास ते साठ हजार रुपये उत्पन्न मिळते. सामनेवाले यांचा सोनी टेन्ट हाऊस व मंडप असुन त्यापासुन त्यांना दहा ते पंधरा लाख रुपये उत्पन्न मिळते. सामनेवालावर अर्जदारांशिवाय कोणीही अवलंबुन नाही. शेवटी अर्जदाराने स्वत:करीता रूपये ७,०००/— व अर्जदार क्र.२ व ३ करीता प्रत्येकी रुपये ५,०००/— ची पोटगी मिळणेकरिता अंतरिम आदेशाची विनंती केली.

०६. सामनेवालाने अर्जदारांचे व त्यांचे नातेसंबंध मान्य केलेले आहेत परंतु त्यांचेवरील आरोप नाकारलेले आहेत. सामनेवाला यांचे नि.क्र.२८ प्रमाणे थोडक्यात कथन असे की, अर्जदाराने नि.क्र.२२ ला केवळ शपथपत्र दिले आहे, त्यासोबत अर्ज दिला नाही. सदर अर्ज नव्याने दिला आहे व त्यास शपथपत्र दिलेले नाही. निशाणी क्र.२४ प्रमाणे जबाब दिलेला असुन त्याप्रमाणे सामनेवाले यांचे पुढे कथन असे की, मुळ अर्ज लांबणीवर पडलेला असतांना हा अर्ज दिलेला आहे. सन २०१६ मध्ये मुळ अर्जास जबाब दिलेला आहे. अर्जदार ही अर्जदार क्र.२ यास टाकुन माहेरी स्वइच्छेने निघुन गेलेली आहे. अर्जदार क्र. २ हा सामनेवाले यांचेकडे राहत असुन ते त्याचे पालनपोषण व शिक्षण करतात.

०७. सामनेवालां यांचे पुढे प्रकरण असे की, सामनेवाला क्र.१ यांनी जळगाव येथील न्यायालयात अर्जदाराने अर्जदार क्र.३ ला सोबत घेवुन नांदावयास यावे म्हणुन अर्ज दाखल केला असुन तो प्रलंबीत आहे. अर्जदाराने आजपावेतो कधीही नांदण्यासाठी प्रयत्न केलेला नाही. अर्जदार तिचे आईसोबत दुकानात पोती घाटण्याचे काम करते व तिला त्यापासुन तीनशे रुपये रोज मिळतो. ती शिवणकाम करते व त्यापासुन तिला दररोज तीनशे ते चारशे रुपये मिळतात. त्यामुळे तिला अन्नवस्त्राची काहीही गरज नाही. यापुर्वी अर्जदाराने चौकशी अर्ज क्र.११/२०१६ दाखल केला असुन तो देखील प्रलंबीत आहे.

**नि.क्र.२८**

अर्जदाराने खोटी माहीती देवुन दिनेश याची खोटी जन्माची नोंद स्वामी दिपक बावीस्कर या नावाने ग्रामपंचायत, न्यायडोंगरी येथे तिचे माहेरी केली आहे. शेवटी सामनेवालेने अर्ज नामंजुर करणेची विनंती केली.

०८. अर्जदार व सामनेवाला यांचे मधील नातेसंबंधाबाबत वाद नाही. युक्तीवादादरम्यान अर्जदार क्र.२ घनश्याम हा सद्यस्थितीत सामनेवाला क्र.१ यांचेकडे राहत असलेबाबत अर्जदाराच्या विधिज्ञांनी मान्य केले आहे व अर्जदार क्र.१ व २ करीताच अंतरीम आर्थिक मदतीची विनंती केलेली आहे.

०९. सामनेवाला क्र.१ तर्फे नि.क्र.३१ सोबत दाखल दस्तानुसार त्याचा अर्जदार क्र.१ ने त्याचेकडे नांदावयास यावे म्हणुनचा अर्ज मंजुर केलेला आहे. सदर अर्जात गैरअर्जदार अर्थात प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार क्र.१ यांना नोटीस तामील होवुनही ती हजर राहीली नव्हती. सदर न्यायनिर्णयाच्या विरोधात वरीष्ठ न्यायालयात दाद मागितलेली नाही. सदर बाब सामनेवाला क्र.१ नांदावयास तयार आहे व अर्जदार क्र.१ स्वइच्छेने माहेरी राहते असे दाखवुन देते. अशा परिस्थितीमध्ये समोरील प्रकरण पाहता अर्जदार क्र.१ ही स्वत:करीता अंतरीम आदेशाच्या स्वरुपात आर्थिक मदत मिळण्यास पात्र असल्याचे दिसुन येत नाही.

१०. अर्जदार क्र.३ हा अर्जदार क्र.१ सोबतच आहे. सन २०१६ मध्ये त्याचे वय चार वर्षे होते. वडील या नात्याने त्यास शिक्षण व इतर बाबीकरीता आर्थिक जबाबदारी पार पाडण्यास सामनेवाला क्र.१ जबाबदार आहे. प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढणेस नक्कीच वेळ लागणार आहे. सामनेवाला क्र.१ याचे वय, मजुरीचे उत्पन्न व समोरिल प्रकरण पाहता अर्जदार क्र.३ करीता तो दरमहा रूपये १,०००/—(रूपये एक हजार मात्र) मंजुर करणे न्याय व योग्य दिसून येते. सामनेवाला क्र.१ सदर रक्कम सहज देवू शकतो, करिता खालील आदेश.

**फौ.चौ.अर्ज क्र.१२/२०१६**
**प्रियंका व इतर वि.**
**दिपक व इतर**

**नि.क्र.२८**

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.३ दिनेश करीता दरमहा रुपये १,०००/— (रूपये एक हजार मात्र) सदर अर्ज दाखल तारखेपासून अर्थात दि.१२/०३/२०२० पासुन अर्जदार क्र.१ कडे सदरच्या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम आदेश म्हणुन द्यावेत.

३. अर्जदार क्र.१ करीता दरमहा अंतरीम रक्कम मिळणेकरीताची विनंती नामंजुर करण्यात येते.

SHARAD GINYANDEV DUBALE
Digitally signed by SHARAD GINYANDEV DUBALE
Date: 2023.02.13 16:35:47 +0530

दिनांक १३/०२/२०२३

(श.गि. दुबाले)
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, नांदगाव